आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२६ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाशिवरात्रीचा आज देशभरात उत्साह

- प्रयागराज इथल्या महाकुंभ मेळ्याची आज सांगता

- दिल्लीतल्या आम आदमी पार्टीच्या सरकारच्या मद्यविक्री धोरणामुळे सरकारी तिजोरीचा २ हजार कोटी रुपयांचा तोटा झाल्याचा कॅगचा ठपका

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विजेतेपदासाठी विदर्भ आणि केरळ यांच्यात लढत सुरु

**<><><><><>**

महाशिवरात्रीचा सण आज देशभरात उत्साहात साजरा होत आहे.

महाराष्ट्रात देखील महाशिवरात्रीचा उत्साह आहे. भगवान शिवाचं स्वरुप असलेल्या एकूण १२ ज्योतिर्लिंगांपैकी पुण्यातलं भीमाशंकर, नाशिकमधलं त्र्यंबकेश्वर, वेरुळचं घृष्णेश्वर, हिंगोलीमधलं औंढा नागनाथ आणि बीड जिल्ह्यातल्या परळी इथलं वैजनाथ अशी ५ ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात आहेत. आज महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यासाठी सर्व मंदिरं आकर्षक रोषणाई आणि फुलांच्या सजावटीने सजली आहेत. महाशिवरात्रीनिमित्त भजन, कीर्तन, पूजा, महाअभिषेक असे विविध धार्मिक कार्यक्रम ठिकठिकाणी आयोजित केले आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त झारखंडमध्ये बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या देवघर इथल्या बाबा वैद्यनाथधाममध्ये भगवान शिवाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. संपूर्ण देवघर शहराला रोषणाई आणि सजावटीने सजवण्यात आलं आहे.

श्रीलंकेतल्या शिव मंदिरांमध्ये विशेषतः पंच ईश्वरम मंदिरांमध्ये महाशिवरात्री साजरी केली जात आहे. शिवरात्रीनिमित्त पूजा करण्यासाठी श्रीलंकेतल्या मंदिरांच्या व्यवस्थापनानं विशेष व्यवस्था केली आहे. श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी श्रीलंकेतल्या हिंदू समुदायाला महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाशिवरात्री निमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत.

भगवान महादेवाचे आशीर्वाद सर्व नागरिकांवर राहावेत आणि देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जात रहावा, अशी कामना राष्ट्रपतींनी समाज माध्यमावर आपल्या संदेशात व्यक्त केली आहे.

महाशिवरात्रीचा सण आत्मनिरीक्षण आणि आध्यात्मिक चेतनेचं प्रतीक असून लोकांना ज्ञान, संयम आणि करुणेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत असल्याचं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

भगवान शंकराचा हा सण सर्व देशवासियांना समृद्धी आणि चांगले आरोग्य देईल, अशी शुभेच्छा प्रधानमंत्र्यांनी दिल्या आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी देखील महाशिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

जगातला सर्वात मोठा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मेळावा मानला जाणाऱ्या महाकुंभाचा समारोप आज महाशिवरात्रीच्या दिवशी होत आहे. १४४ वर्षातून एकदाच येणाऱ्या या पर्वानिमित्त गंगा यमुना आणि सरस्वती या तीन पवित्र नद्यांच्या संगमावर प्रयागराज इथं करोडो भाविकांनी स्नानाचा लाभ घेतला. पौष पौर्णिमेला सुरु झालेला हा महाकुंभमेळा जगाच्या कानाकोपऱ्यातल्या लोकांसाठी

आकर्षण ठरला आहे.  सुमारे साडे पासष्ट कोटी भाविकांनी महाकुंभात स्नान केल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

महाकुंभ पर्वात देशाचे सांस्कृतिक बंध दृढ करण्यात प्रसारभारतीनं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीत सेहगल यांनी म्हटलं आहे. या पर्वाचे सर्व ४८ दिवस चाललेल्या कुंभवाणी वाहिनीमार्फत आकाशवाणीने करोडो लोकांशी संपर्क साधला, असं ते म्हणाले....

**बाईट**

देशाची सार्वजनिक प्रसारण व्यवस्था म्हणून आकाशवाणीने या उत्सवात चोख कामगिरी बजावली असं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी म्हणाले. कुंभवाणीमार्फत कमीतकमी वेळात अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याच्या आकाशवाणीच्या कामगिरीबद्दल महासंचालक प्रज्ञा पालिवाल – गौर यांनी प्रशंसा केली.

**<><><><><>**

या महामेळाव्यासाठी प्रशासकीय आणि सुरक्षा यंत्रणा सज्ज होत्या. भारतीय रेल्वेनं देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांसाठी जादा गाड्यांची व्यवस्था केली. आज सकाळी ९ वाजेपर्यंत प्रयागराज मधल्या विविध स्थानकांवरुन मिळून ११५ गाड्या रवाना झाल्या. या गाड्यांमधून सहा लाखापेक्षा जास्त भाविकांनी प्रवास केला असं रेल्वे मंत्रालयाने सांगितलं.  आज दिवसभरात सुमारे साडेतीनशे गाड्या सोडण्यात येतील. काल ३१४ गाड्यांमधून १४ लाखापेक्षा जास्त भाविक रवाना झाले. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आणि रेल्वे मंडळाचे अध्यक्ष सतीश कुमार रेल्वे व्यवस्थापनावर सतत लक्ष ठेवून आहेत.

<><><><>

कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या एकूण सदस्य संख्येत गेल्या डिसेंबरमधे १६ लाखाची भर पडली. ही सुमारे ९ पूर्णांक ७ दशांश टक्के वाढ आहे. केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाने जाहीर केलेली आकडेवारी सांगते, की नवीन सदस्यांपैकी ४ लाख ८५ हजार सदस्य १८ ते २५ वर्ष वयोगटातले आहेत.

<><><><>

किसान क्रेडिट कार्ड अंतर्गत आत्तापर्यंत दहा लाख कोटी रुपयांहून अधिक कर्ज वितरीत करण्यात आली असून त्याचा फायदा सात कोटी ७२ लाख शेतकऱ्यांना झाला आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थ मंत्रालयानं दिली आहे. किसान क्रेडिट कार्ड खात्यांअंतर्गत २०१४मध्ये असलेल्या सव्वा ४ लाख कोटी रुपयांवरून वाढून ती डिसेंबर २०२४ मध्ये दुप्पट म्हणजे १० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली आहे.

<><><><>

मुंबईत होऊ घातलेल्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटमधे ट्रेलर मेकिंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. व्हिडिओ संपादन, चित्रपट निर्मिती याची आवड असणाऱ्यांसाठी ही स्पर्धा  आहे. यात कमीत कमी अठरा वर्षं वयाचे स्पर्धक भाग घेऊ शकतात. ट्रेलर पाठवण्याची मुदत ३१ मार्च पर्यंत आहे.

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आह. जगभरातल्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाचं लक्ष भारताकडे वेधणं हे या समिटचं उद्दिष्ट आहे.

<><><><>

दिल्लीतल्या आम आदमी पार्टीच्या सरकारनं राबवलेल्या मद्य धोरणामुळे सरकारी तिजोरीतील २ हजार कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचं कॅगच्या अहवालात म्हटलं

आहे. नव्यानं स्थापन झालेल्या भाजपा सरकारने दिल्ली विधानसभेत काल कॅगचा अहवाल मांडला. आप सरकारनं राबवलेल्या या धोरणात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. मद्य धोरणामुळे आप सरकारवर टीकेची झोड उठली होती, यामुळे आम आदमी पार्टीचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याचं सांगितलं जातं.

**<><><><><>**

पंजाबमधल्या लुधियाना पश्चिम विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी आम आदमी पार्टीने राज्यसभेचे खासदार संजय अरोरा यांना उमेदवारी दिली आहे. अरोरा हे २०२२ पासून राज्यसभेचे सदस्य आहेत. लुधियाना पश्चिमचे आपचे आमदार गुरप्रीत बस्सी गोगी यांचं गेल्या महिन्यात निधन झाल्यामुळे ही जागा रिक्त झाली आहे.

**<><><><><>**

भारताचा आफ्रिकेबाबतचा दृष्टिकोन हा चीन प्रमाणे शोषणाचा नसून तो, परस्पर हिताच्या भागीदारीवर आधारलेला असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते जपान- भारत-आफ्रिका व्यवसाय उद्योग व्यवसाय मंचाच्या कार्यक्रमात व्याख्यान देताना ते दूरस्थ पद्धतीनं बोलत होते.

भारत आणि जपानमध्ये परस्पर पूरक क्षमता असून, त्यांच्या उपयोगानं हे दोन्ही देश आफ्रिकेच्या शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देऊ शकतात, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

परराष्ट्रव्यवहार राज्यमंत्री पबित्र मार्गरिटा येत्या शुक्रवारपासून ९ दिवस दक्षिण अमेरिकेतल्या ४ देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. प्रथम ते उरुग्वेमधे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष यमांडु ओर्सी यांच्या शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहतील. बहामा आणि बार्बाडोसमधे ते उभयपक्षी सहकार्यावर उच्चपदस्थांची भेट घेतील. गेल्या नोव्हेंबरमधे गयानामधे झालेल्या भारत कॅरिकोम शिखर परिषदेत या

देशांबरोबर झालेल्या चर्चेतल्या मुद्द्यांवर ते भारताचे प्रतिनिधी म्हणून चर्चा करतील. बार्बाडोसमधे तिथला सर्वोच्च नागरी सन्मान फ्रीडम ऑफ बार्बाडोस ते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वतीनं स्वीकारतील.

**<><><><><>**

देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेतली सर्वात प्रतिष्ठित रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी माजी विजेता विदर्भ आणि केरळ यांच्यातल्या अंतिम सामन्याला आज सुरुवात झाली. नागपूर इथं सुरू असलेल्या या सामन्यात केरळनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. त्यानंतर पहिल्या सत्राच्या खेळात केरळनं केवळ २४ धावांमध्येच विदर्भाचे आघाडीचे तीन फलंदाज तंबूत धाडले. मात्र त्यानंतर दानिश आणि करूण नायर यांनी शतकी भागिदारी करत विदर्भाचा डाव सावरला.

उपांत्य फेरीच्या सामन्यात दोन वेळच्या विजेत्या विदर्भानं मुंबईला नमवत अंतिम फेरी गाठली.

**//<><><><><>//**